MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात





बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -२८८ | गुरूवार दि.११ जुलै २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -288 | THURSDAY DT. 11 JULY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# मनोज जरांगेच्या बीडमधील शांतता रॅलीसाठी रेकॉर्ड ब्रेक गर्दी, सर्व रस्ते जाम

मराठा समाज आरक्षण शांतता रॅलीची जबाबदारी घेणाऱ्या

## स्वप्नील गलधरला मनोज जरांगे पाटील यांनी आमदार करावे!



## मराठा आरक्षणप्रश्नी जरांगे सभेत काय बोलणार?

**मनोज जरांगे पाटील यांची आज बीडमधून शांतता रॅली निघणार आहे. यासाठी लाखोंच्या संख्येने लोक सहभागी होताना दिसत असून या रॅलीत आता तुफान गर्दी झाली आहे. सर्व रस्ते जाम झाले आहेत. पाचही जिल्ह्यातील गर्दीचे सर्व रेकॉर्ड मोडणारी ही गर्दी असल्याचे सांगितले जात आहे.**

**लोकसभेचा निकाल लागल्यापासून बीड जिल्ह्याची राजकीय समीकरणे बदलून गेली आहेत. आज बीडच्या सभेत मराठा आंदोलन मनोज जरांगे पाटील काय बोलणार? त्यांच्या निशाणावर कोण असणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

बीडमध्ये रेकॉर्ड ब्रेक गर्दी

मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची बीडमध्ये आज शांतता रॅली होत असून शहरात रेकॉर्ड ब्रेक गर्दी झाल्याचे सांगितले जात आहे. लाखोंच्या संख्येने बीड शहरात मराठा बांधव येत असून पाचही जिल्ह्यातील सर्व गर्दीचे रेकॉर्ड मोडणारी ही गर्दी असल्याचे सांगण्यात येत आहे.

पोलिसांचा कडक बंदोबस्त

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी शहरात प्रचंड संख्येने मराठा बांधव येत आहेत. त्यामुळे शहरात पोलिसांचा तगडा बंदोबस्त लावण्यात आला आहे. तसेच ५००० स्वयंसेवक ही मदतीला असणार आहेत.

मराठा समाजासह सगळे सोयऱ्यांनाही मराठा आरक्षण लागू करण्याचा अध्यादेश जारी करण्यासाठी मनोज जरांगे यांनी सरकारला १३



जुलैची मुदत दिली असून ते आठवडाभरासाठी मराठवाड्याच्या दौऱ्यावर आहेत. आज त्यांची बीडमध्ये शांतता रॅली आहे.

शहरात रॅलीचा कसा राहणार मार्ग?

बीड शहरातील बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून रॅलीला सुरुवात होऊन माळी वेस, सुभाष रोड , अण्णाभाऊ साठे चौक ,जालना रोडमार्गे ही रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौकात येईल. येथे मनोज जरांगे पाटील हे मराठा समाज बांधवांशी संवाद साधणार आहेत. या रॅलीची संयोजकांकडून पूर्ण तयारी झाली आहे.

रॅलीची तयारी पूर्ण, चौकात भगवे झेंडे, बॅनर

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सर्व बाजूने भगवे झेंडे,बॅनर लागलेले आहेत. तसेच छोटे-मोठे मंडप घालण्यात आले असून तिथे पिण्याचे पाणी आणि नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली आहे. याच ठिकाणी रुग्णवाहिका तसेच इतर अत्यावश्यक सेवा ही उपलब्ध असणार आहे. स्वयंसेवकांसह पोलिस अधिकारी आणि कर्मचारी नागरिकांना शिस्तीसाठी आवाहन करत आहेत.

नक्की कशी करण्यात आलीये व्यवस्था?

बीड शहरातील शांतता रॅलीसाठी ८० भोंगे बसवण्यात आले असून ८०० स्वयंसेवक सज्ज आहेत. तसेच आपत्कालीन परिस्थितीसाठी १२ रुग्णवाहिका असून त्यातील ४ कार्डियाक रुग्णवाहिका आहेत. घरासाठी ३५०० पुरुष स्वयंसेवक व १५०० महिला स्वयंसेवक सज्ज असून १५ डॉक्टरांची नेमणूक करण्यात आली आहे.



- मराठा समाज आरक्षण शांतता रॅलीची जबाबदारी घेणाऱ्या स्वप्नील गलधरला. मनोज जरांगे पाटील यांनी आमदार करावे.
- स्वतःच्या पदाला लाथ मारून भाजप पद सोडत स्वप्निल गलधरणे मनोज जरांगे यांचे नेतृत्व स्वीकारले समाजासाठी झटणारा स्वप्निल गंलधर आमदार होणे गरजेचे.
- बीड जिल्हा पोलीस प्रशासनाने मराठा आरक्षण शांत कार्यालय देत असताना सर्व जिम्मेदारी स्वप्नील गलधरणे घेतली पाहिजे अशी ही अट घातली ३९ साठी मान्य करत जबाबदारी घेतली मराठा शांत झाली यशस्वीपणे करू
- १८ पगड जाती धर्मासाठी जपणारा स्वप्नील गंध सर्व समाजांना सोबत घेऊन चालतो म्हणून आपण उमेदवारी देऊन सर्व जाती धर्माला न्याय द्या
- मुस्लिम दलित समाज स्वप्निल गलधर साठी सदैव रस्त्यावर आज मराठा शांतता रॅलीमध्ये दलित मुस्लिम बांधवांची लक्षणीय उपस्थिती.
- शांतता रॅलीसाठी मराठ्यांऐवजी दलित मुस्लिम समाजात जास्त उत्साह.
- स्वप्निल गलधर सर्वांच्या मदतीला धावणारा तरुण तडफदार कार्यकर्ता मनोज दादा जरांगे आपण एक वेळा स्वप्निल भैय्याला आमदार कराच सर्वसामान्य जनतेकडून मनोज दादा जरांगे यांच्याकडे मागणी



# महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत परळी तालुक्यातील बेलंब्यात लाखो रुपयांचा अपहार; विहीर न खोदता उचलले पैसे

## परळी पंचायत समितीतील भ्रष्ट अधिकारी कर्मचारी व रोजगार सेवक यांना निलंबित करण्याचे प्रशासनाचे आदेश

परळी (प्रतिनिधी)

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत बेलंबा येथे विहीर न खोदता विहिरीसाठी असलेले मस्टर स्वरूपातील १ लाख १२ हजार दोनशे तीन रुपये मजुरांच्या नावे रोजगार हमी कायदा व शासन निर्णय डावलुन देण्यात आले होते. शासन निधीचा दुरुपयोग करून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी परळी पंचायत समितीतील तांत्रिक अधिकारी ए ए पोलशेटवार, ऑपरेटर एस एस पिटलेवाड, ग्रामरोजगार सेवक सुरेश बलभीम गित्ते यांना शासकीय सेवेतून निलंबित करावे असा आदेश जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी परळी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांना दि. ९ जुलै २०२४ रोजी पारित केला असल्याची माहिती तक्रारदार वंचित बहुजन आघाडीचे युवा महासचिव ज्ञानेश्वर जीवन गित्ते यांनी पत्रकार परिषदेत दिली. दरम्यान सदरील प्रकरणामुळे परळी तालुक्यात एकच खळबळ उडाली असून अनेक गावातील न खोदता पैसे उचललेल्या सिंचन विहिरींची प्रकरणे या निमित्ताने बाहेर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण हमी योजनेअंतर्गत बेलंबा येथील पांडुरंग खंडू सरवदे यांना सिंचन विहिर मंजूर करण्यात आली होती. सदरील विहीर न खोदता विहिरीसाठी असलेले मस्टर पूर्ण करून रोजगार हमी कायद्याची पायमल्ली करण्यात आली. शासन निधीचा दुरुपयोग करून शासनाची फसवणूक करणारे परळी पंचायत समिती मधील तांत्रिक अधिकारी पोलशेटवार ए. ए.पंचायत समिती परळी ऑपरेटर पिटलेवाड व बेलंबा येथील ग्रामरोजगार सेवक सुरेश बलभीम गित्ते यांनी शासन नियमबाह्य कामकाज करून पांडुरंग खंडू सरवदे रा. बेलंबा यांना विहीर न खोदता सदरील विहिरीसाठी १ लाख १२ हजार २०३ रुपये मजुरांच्या नावे रोजगार हमी कायदा व शासन निर्णय डावलून देण्यात आले. तशी तक्रार वंचित बहुजन आघाडीचे युवा महासचिव ज्ञानेश्वर जीवन गित्ते यांनी परळी पंचायत समिती गटविकास अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली होती.

सदरील निवेदनाची दखल घेऊन तत्कालीन विस्तार अधिकारी यांनी दि. ८ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रत्यक्ष जायमोक्यावर जाऊन चौकशी केली असता शेतामध्ये विहिरीचे खोदकाम झालेले नाही असा अहवाल सादर केला होता. त्या अनुषंगाने संबंधितांना कारणे दाखवा नोटीस देऊन खुलासाही मागणीला होता. प्रशासकीय मान्यता दिलेली नसतानाही संबंधितांनी वर्क ऑर्डर जनरेट करणे, मागणी नसतानाही मस्टर काढणे, मोजमाप पुस्तिका व मस्टर नसतानाही पांडुरंग खंडू सरवदे यांची विहिरीचे काम न होताच मस्टर काढून शासकीय रक्कम १ लाख १२ हजार २०३ रुपयांचा अपहार केला होता. याप्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांनी शासन परिपत्रक दि. २५ ऑगस्ट २०२१ व दि ११ नोव्हेंबर २०२० मधील तरतुदीनुसार संबंधितांच्या सेवा आपल्या स्तरावर कमी करण्यात येऊन तसा अहवाल कार्यालयास सादर करावा असे पत्र गटविकास अधिकारी पंचायत समिती यांना काढले आहे. सदरील पत्रकार परिषदेस वंचित बहुजन आघाडीचे युवा महासचिव ज्ञानेश्वर गित्ते, युवक आघाडी तालुकाध्यक्ष राजेश सरवदे, परळी शहराध्यक्ष गफारशहा खान, प्रसिध्दी प्रमुख बालासाहेब जगतकर,युवा ता. उपाध्यक्ष अवि मुंडे,संतोष वाव्हळे यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.



लोणी येथे सुरक्षा अभियान या मोहिमेचे मार्गदर्शन करताना अभोरा पोलीस स्टेशन चे सपोनि मंगेश साळवे साहेब व खंडागळे साहेब हे उपस्थित होते त्यामुळे ग्रामस्थांनी त्यांचा एकत्रित सत्कार केला छायाचित्र सुरेश कांबळे

# लोकनेते डॉ.बाबुराव जोगदंड यांचा वाढदिवस चौसाळा येथे विविध सामाजिक उपक्रमाने साजरा

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्ह्यातील नामांकित शिक्षण संस्था गुरु महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित गुरुदत्त माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चौसाळा या संस्थेचे अध्यक्ष आदरणीय डॉक्टर बाबुरावजी जोगदंड यांचा वाढदिवस शाळेच्या मैदानावर विविध शैक्षणिक उपक्रमांनी संपन्न झाला या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे कोषाध्यक्ष एडवोकेट रामेश्वर जी काशीद प्रमुख पाहुणे संस्थेचे उपाध्यक्ष सयाजी शिंदे, संस्थेचे शालेय समिती सदस्य उमेश आंधळे, शालेय समिती सदस्य संभाजी आबा जोगदंड, उमेश जोगदंड चेअरमन सेवा सहकारी सोसायटी तसेच घरत नाना ,अविनाश मुंडे ,संभाजी आंधळे ,सिद्धेश्वर हावळे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. वाढदिवसानिमित्त घरत नाना यांच्यातर्फे शाळेतील तीनशे विद्यार्थ्यांना



लिहिण्याचे पॅड वाटप करण्यात आले तसेच संभाजी आबा जोगदंड उमेश रावजी आंधळे, उमेश जोगदंड यांच्यावतीने सर्व विद्यार्थ्यांना वॉटर बॅग याचं वाटप करण्यात आल्या तसेच शाळेतील शिक्षक वृंदांच्यावतीने अनाथ व गरजू विद्यार्थ्यांना शालेय गणवेशाचे वाटप करण्यात आले. शालेय विद्यार्थ्यांनी ग्रंथदिंडी संपूर्ण गावातून काढून डॉक्टर साहेबांसाठी परमेश्वराकडे उदंड आयुष्य व यश कीर्ती लाभो असे साकडे घातले पालक वर्गातून व विद्यार्थ्यांकडून शुभेच्छा व मनोगतातून डॉक्टर साहेब बद्दल गौरव उद्गार व समाधान व्यक्त करण्यात आले. ग्रंथ दिंडीची सांगता या ज्ञान पंढरीच्या चिमुकल्या वारकऱ्याकडून विविध अभंग भारुड गवळणी व रिंगण अशा विविध उपक्रमांमधून व अभिनय नृत्यातून आपल्या कलागुणांचा अविष्कार दाखवण्यात आला. या कार्यक्रमाचे मार्गदर्शक शाळेचे मुख्याध्यापक श्रीमंत चौधरी सर यांनी प्रस्ताविका मधून डॉक्टर साहेब यांची शाळेबद्दलची स्वप्न सांगताना शाळेतील प्रयोगशाळा ग्रंथालय क्रीडांगण संगणक कक्ष याबरोबरच गुणवत्ता पूर्ण शिक्षण व सुजान नागरिक घडवण्याबद्दलचं साहेबांचं स्वप्न आम्ही साकार करू अशी ग्वाही दिली व साहेबांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री केदार सर ,श्री घोडके सर ,श्री मोटे सर, श्रीमती साबणे ,मॅडम श्री राठोड सर, श्री लिमकर सर ,श्री गुरव सर, श्री वैद्य सर ,बाळासाहेब जाधव यांनी परिश्रम घेतले. शेवटी सर्व शिक्षक वृंदांच्या परिश्रमातून महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते त्याचा आस्वाद उपस्थित विद्यार्थी पालक मान्यवरांनी घेतला आणि कार्यक्रमाची सांगता झाली

# महाराष्ट्र विद्यालयात ‘ताण-तणावाचे व्यवस्थापन’ या विषयावर कार्यशाळा संपन्न !

केज (प्रतिनिधी)

जिल्हा मानसिक आरोग्य जनजागृती कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्र विद्यालयात 'ताण-तणावाचे व्यवस्थापन' या विषयावर कार्यशाळा संपन्न झाली.याबाबत सविस्तर वृत्त असे की,जिल्हा मानसिक आरोग्य जनजागृती कार्यक्रम व आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्ट यांच्या मार्फत महाराष्ट्र विद्यालयात इयत्ता दहावीच्या मुलां-मुलींसाठी 'ताण-तणावाचे व्यवस्थापन' या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून मानसिक आरोग्यावर मूलभूत काम करणारे अतुल बडवे (एमपॉवर फेलो,बीड) हे उपस्थित होते. ' जीवन ताणाशिवाय जगताच येत नाही. पण त्याचे नियंत्रण करता येणे हा एक कौशल्याचा भाग आहे' असे प्रतिपादन श्री.अतुल बडवे यांनी यावेळी बोलताना केले. ताण- तणावाची लक्षणे, त्याची कारणे; ताण- तणाव व्यवस्थापनाची तंत्रे व पद्धती ;ताण कमी करण्याची तंत्रे तसेच मन म्हणजे काय? मन आजारी पडते म्हणजे काय? मन आजारी पडल्यावर काय करावे? कोणते उपचार कोठे घ्यावेत ? इत्यादी महत्त्वपूर्ण



बाबींवर मुलां-मुलींना बोलते करून संवादाच्या माध्यमातून विवेचन केले. व्याख्यानाच्या शेवटी मुलां-मुलींच्या विविध प्रश्नाला उत्तरे देऊन त्यांच्या मानसिक स्वास्थ्याबद्दल महत्त्वपूर्ण अशी जाणीव जागृती निर्माण करण्यात आली.

प्रत्येक चार भारतीय मागे एकजण मानसिक आजारी होत असून आपल्या कुटुंबात, आपल्या अवतीभोवती *मानसिक आजराने त्रस्त असलेल्या व्यक्तींसाठी मोफत सहाय्य व समुपदेशनासाठी १४४१६ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन याप्रसंगी अतुल बडवे यांनी केले. याप्रसंगी दत्तात्रय मुजमुले (संवाद मित्र) यांनीही विद्यार्थ्यांशी हितगुज केले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक मा .आर एम .काकडे यांनी भूषविले तर पाहुण्यांचा परिचय व सूत्रसंचालन श्री सुधाकर तट यांनी केले . शेवटी शाळेच्या वतीने श्री पाचनकर यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी प्रयत्न केले.

# शंभर टक्के नुकसान भरपाई आणि आदामा कंपनीचा औषधनिर्माण परवाना रद्द करा

## काँग्रेसचे दत्ता कांबळे यांनी कृषी कार्यालय धरले धारेवर :अन्यथा आंदोलन

**माजलागाव (प्रतिनिधी)**

**पुरुषोत्तमपुरी येथील नुकसानग्रस्त शेतकरी बाळासाहेब शेंडगे यांनी दोन एक्कर शेतात सोयाबीनवर आदामा कंपनीचे तननाशक फवारणी केली होती. आदामा कंपनीच्या तननाशक फवारणी केल्यानी बाळासाहेब शेंडगे यांचे दिड एक्कर वरील सोयाबीन जळूण खाक झाल्याने सदरील शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले होते.**



सदरील नुकसानग्रस्त शेतकऱ्याला न्याय मिळून देण्याच्या अनुषंगाने भारतीय काँग्रेस पक्षाच्या अनु जाती विभागाचे जिल्हाध्यक्ष दत्ता कांबळे यांच्या नेतृत्वात आज उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय यांना नुकसानग्रस्त शेतकऱ्यास शंभर टक्के नुकसान भरपाई व अदामा औषध निर्माण कंपनीचा अधिकृत परवाना रद्द करण्याची मागणी भारतीय काँग्रेसच्या वतीने करण्यात आली.

यावेळी तालुक्यातील उपविभागीय कृषी कार्यालय येथील कृषी अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना काँग्रेसचे नेते दत्ता कांबळे यांनी चांगलेच धारेवर धरून, अदामा कंपनी सोबत तात्काळ पत्रव्यवहार करण्याचे सांगितले अन्यथा संविधानिक मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा सदरील निवेदनाद्वारे कृषी अधिकारी यांना देण्यात आला.यावेळी भारतीय काँग्रेसचे नेते दत्ता कांबळे सह नुकसानग्रस्त शेतकरी बाळासाहेब शेंडगे, नाथाभाऊ घडसे, उल्हास कदम, अशोक कांबळे, अंशीराम कांबळे, रामभाऊ डोंगरे, दत्ता कसबे, अविष्कार भिसे, भीष्मा लोखंडे सह भारतीय काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# महाराष्ट्र कृषी क्रांतीचा जनक - मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## मुख्यमंत्र्यांनी स्वीकारला महाराष्ट्राचा सर्वोत्कृष्ट कृषी राज्याचा पुरस्कार.

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)**

**पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षा यांच्या माध्यमातून राज्याकडून घेतल्या गेलेल्या शाश्वत विकास धोरणांची दखल घेत, १५व्या कृषी नेतृत्व समितीचा २०२४ चा प्रतिष्ठित सर्वोत्कृष्ट कृषी राज्य पुरस्कार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हा पुरस्कार राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यासोबत स्वीकारला. केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान यांच्या हस्ते हा पुरस्कार आज प्रदान करण्यात आला.**

१५ व्या कृषी नेतृत्व समितीच्या- २०२४ कॉनक्लेव्हचे एग्रीकल्चर टुडे समूहाच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश व केरळचे राज्यपाल पी. सदाशिवम यांच्या अध्यक्षतेखाली १५व्या कृषी नेतृत्व पुरस्कार समितीने राज्यातील पर्यावरण रक्षण, अन्न सुरक्षा आणि शाश्वत विकास धोरणांची दखल दखल घेत महाराष्ट्र राज्याला सर्वोत्तम कृषी राज्य म्हणून निवड केली आहे.

पुरस्कार वितरण सोहळ्यात केंद्रीय रस्ते परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंह चौहान, एग्रीकल्चर टुडे समूहाचे अध्यक्ष डॉ. एम.जे. खान, राज्याच्या कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल व इतर मान्यवर उपस्थित होते. पुरस्कार स्वीकारल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील कृषी विकासाच्या विविध योजना आणि शाश्वत विकासासाठीच्या प्रयत्नांची माहिती दिली. यावेळी माहिती देताना ते म्हणाले, महाराष्ट्र हे कृषी क्रांतीचं जनक राज्य आहे. महाराष्ट्रला हरित क्रांतीची समृद्ध परंपरा आहे आणि कृषी व शेतकऱ्यांचा सन्मान करण्याची गौरवशाली परंपरा देखील आहे. राज्याचे प्रमुख म्हणून हा पुरस्कार स्वीकारताना मला आनंद होत आहे.मी एक सामान्य शेतकरी कुटुंबातून आलो असून हा पुरस्कार स्वीकारताना मला मोठा अभिमान वाटतो.




महाराष्ट्र राज्याला कृषी क्षेत्रात सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या राज्याच्या रूपात निवडल्याबद्दल 'एग्रीकल्चर टुडे' आणि परीक्षक मंडळाचे आभार मानत, हा पुरस्कार राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा सन्मान आहे. शेतकऱ्यांचे कष्ट, मेहनत आणि मातीच्या प्रेमाचं ही फलश्रुती आहे. आमच्या शेतकऱ्यांना 'अन्नदाता' म्हणून मान दिला जातो आणि राज्य सरकारने त्यांच्या हितांसाठी सर्वोच्च प्राधान्य दिले आहे.

महाराष्ट्रातील शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यास उत्सुक आहेत आणि आम्ही प्रगतिशील शेतकऱ्यांचा सन्मान करत असतो, जेणेकरून अधिकाधिक शेतकरी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करतील. बदलत्या काळानुसार आणि हवामानातील बदल पाहता, आमचा शेतकरी सदैव जागरूक आहे आणि त्यामुळेच महाराष्ट्र कृषी क्रांतीत अग्रेसर असल्याची माहिती दिली .युनोचे सरचिटणीस अँण्टिवो गुट्रेस यांनी तापमान वाढीचे युग संपले असून, होरपळीचे युग सुरु झाल्याचे आणि तातडीच्या प्रयत्नांची गरज असल्याचे सांगितले होते. महाराष्ट्र सरकारने या आव्हानाला प्रतिसाद देत २१ लाख हेक्टरवर झाडे लावण्याचा आणि ५ टक्के बायोमास वापरण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे महाराष्ट्राने जगातील मानव जात वाचवण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत असेही त्यांनी यावेळी सांगितले. राज्य शासनाने बांबू मिशनला प्राधान्य दिले असून, बांबू ही विशेष वनस्पती असल्याचे सांगत, बांबू पासून २००० प्रकारच्या वस्तू तयार याची माहिती होत असल्याची माहिती श्री. शिंदे यांनी यावेळी दिली. 'बांबू घास नही खास है' असे म्हणत बांबू मुळे पर्यावरण संवर्धन आणि अन्न सुरक्षा यावरही भर दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांसाठी अनेक योजना राबविल्या आहेत आणि त्यांना कर्जमाफीसाठी सहकार्य केलं आहे. तसेच, पीक विमा योजनेत महाराष्ट्र राज्य अग्रेसर आहे. लातूर जिल्ह्यात देशातील पहिला मायक्रो मिलेट क्लस्टर सुरू केला आहे आणि सिंचन प्रकल्पांद्वारे १७ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्याचा ध्येय निश्चित केले आहे.राज्यातील शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचं ठरवले आहे आणि कपास व सोयाबीन शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य देण्यात येत असल्याचे माहिती दिली.



पिंपरी चिंचवड या ठिकाणी पिंपरी चिंचवड शहराचे सामाजिक कार्यकर्ते व रंजित (आबा)कलाटे फाउंडेशन चे सर्वेसर्वा रणजित भाऊ कलाटे यांची सदिच्छा भेट घेतली यावेळी अक्षय भाऊ वाघमोडे, युवा पत्रकार अंकुश गवळी व बाळासाहेब सोलंकर आधी कार्यकर्ते उपस्थित होते

# शिरूर तालुक्यात कोमेजलेल्या पिकांना मिळाले जीवदान वरुणराजाची वेळेवर हजेरी-दुबार पेरणीचे संकट टळले

**शिरूरकासार (प्रतिनिधी) मॉन्सूनच्या सुरुवातीलाच वरुणराजाने दमदार हजेरी लावल्यामुळे बळीराजाने कोणत्याही अंदाजावर अवलंबून न राहता पेरणी करण्याची घाई केली.परंतु गत पंधरा दिवसांपासून वरुणराजाने उघडीप दिल्यामुळे तालुक्यातील बळीराजाच्या नजरा आकाशाकडे लागल्या होत्या.पावसाने पाठ फिरविल्यामुळे दुबार पेरणीचे संकट ओढावते की काय?अशी भीती वाटत असतानाच सोमवारी झालेल्या दमदार पावसाने शेतातील उभ्या असलेल्या पिकांना जीवदान देण्याचे काम केले आहे.**

पंधरा दिवसानंतर आणि गरजेच्या वेळी पडलेल्या पावसामुळे शेतकरी सुखावला असून तूर्तास त्याच्यावर घोंगावत असणारे दुबार पेरणीचे सावट दूर झालेले दिसत आहे.तालुक्यात एकूण सहा कृषी मंडळ असून त्या मध्ये शिरूरसह



गोमळवाडा,ब्रम्हनाथ येळंब,खालापुरी,रायमोहा,तिंतरवणी यांचा समावेश आहे.सहाही मंडळात मोठ्या प्रमाणावर खरिपाची पेरणी मोठ्या प्रमाणावर झालेली आहे.तालुक्यात एकूण ६४४१३.३१ हेक्टर क्षेत्र असून त्यापैकी ५४१५३.१७ हेक्टर क्षेत्र पेरणीलायक आहे.सध्या ४७४८७ हेक्टर क्षेत्रावर पेरणी करण्यात आली आहे.पेरणी क्षेत्रामध्ये बाजरी,मका,तुर,उडीद,मुग,भुईमूग,सूर्यफूल,तीळ, सोयाबीन,कारळ,कापूस या पिकांचा समावेश आहे.शेतातील उभ्या असलेल्या पिकांना पावसाची गरज असताना सोमवारी झालेल्या दमदार पावसाने पिकांना जीवदान मिळाले आहे.पेरणी आणि मशागत करून वरुणराजाची वाट पाहणाऱ्या बळीराजाला मोठा दिलासा मिळाला असून त्याच्यावर घोंगावणारे दुबार पेरणीचे संकट तूर्तास तरी टळले आहे.

# चौसाळा शहराला पाणीपुरवठा करणारया पाण्याच्या टाकीखाली घाणीचे साम्राज्य

पवन कुचेकर स्वखर्चातुन केली फवारणी

बीड (प्रतिनिधी)

बीड तालुक्यातील चौसाळा ग्रामपंचायत ही सर्वात मोठी मानली जाते परंतु चौसाळा ग्रामपंचायते ग्रामपंचायतचे कायमच दुर्लक्ष असल्याचे चित्र सध्या पाहावयास मिळत आहे. शहरात पाणी पुरवठा करणारया पाण्याच्या टाकीखाली घाणीचे साम्राज्य पाहावयास मिळत असुन परिसरात गवत मोठया प्रमाणावर वाढलेले असल्यामुळे या भागात मच्छराचे प्रमाण वाढले असुन यामुळे रोगराई पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही याबाबतीत चौसाळा ग्रामपंचायला तोंडी कळवुन देखील कुठलीच कारवाई न केल्यामुळे भाजपचे अनुसुचित जाती मोर्चाचे बीड तालुका अध्यक्ष पवन कुचेकर यांनी स्वखर्चातुन स्वताच्या पाठीवरती फवारणी पंप घेत याभागात फवारणी केलेली पाहायला मिळाली चौसाळा ग्रामपंचायत बाबतीत सर्वसामान्य नागरिक नाराजी व्यक्त करताना पाहावयास मिळत आहे.



# नाशिक जिल्ह्यातील मातंग तरूणास मारहाण प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवा

माजलगाव (प्रतिनिधी)

नाशिक जिल्ह्यातील येवला येथे मातंग दलित समाजातील प्रसाद सुनिल खैरनार या तरूणास अमानवी मारहाण केल्याची घटना घडली असुन या घटनेचा निषेध करत हे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवावे अन्यथा राज्यभर तिव्र आंदोलन करण्याचा इशारा मानवी हक्क अभियानच्या वतीने उपजिल्हाधिका-यांना निवेदनाव्दारे दि. १० जुलै रोजी देण्यात आला आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, मातंग समाजातील एका युवकास लाठ्या, काठ्याने चार तास मारहाण करून या घटनेचा व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल केला परंतु घटनेतील आरोपी अद्यापही मोकाटच आहेत. प्रसाद खैरनार यास जातीयवादी भावनेतून मारहाण झाली असुन आरोपींना तात्काळ अटक करून प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावे अशी मागणी उपविभागीय अधिका-यांकडे निवेदनाव्दारे करण्यात करण्यात आली आहे. निवेदनावर मानवी हक्क अभियानचे



तालुकाध्यक्ष मधुकर कांबळे, रमेश गवळी, शहराध्यक्ष संदीप वाघमारे, बाबासाहेब थोरात, बबन खंडागळे, बाजीराव खंडागळे, कचरू कांबळे, रमेश जाधव, सुंदर भिसे, सुधाकर कांबळे, अशोक थोरात, राजेश थोरात, सर्जेराव लोखंडे, प्रकाश थोरात, सुनिल थोरात, रोहिदास खंडागळे, दिपक गायकवाड, अनिकेत वाघमारे यांचेसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# अनुदानाचा वाढीव टप्पा देण्याचे आश्वासन न पाळणाऱ्या शासनाच्या विरोधात विनाअनुदान शाळेतील शिक्षकांचे आजपासून आंदोलन

## विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शिक्षक काळ्याफिती लावून अध्यापनासह सर्व शालेय कामकाज करणार- खंडेराव जगदाळे

बीड (प्रतिनिधी)

राज्यातील विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळांना प्रचलित नियमानुसार टप्पा वाढ अनुदान देण्याचे आश्वासन काही दिवसापूर्वी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार, शिक्षण मंत्री दीपक केसरकर, यांनी दिले होते. परंतु या अधिवेशनात वाढीव टप्पा न देता केवळ पुन्हा एकदा आश्वासन देऊन या शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम शासनाने केले. टप्पा वाढीचे आश्वासन शासनाने न पाळल्यामुळे राज्यातील विनाअनुदानित शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांत संतापाची लाट उसळली असून संतप्त झालेल्या या सर्व शिक्षकांनी आजपासून तीव्र आंदोलन करण्याचे जाहीर केले. याचाच भाग म्हणून आज पासून राज्यातील सर्व विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी काळ्याफिती लावून काम करण्याचे आंदोलन सुरू केले. या आंदोलनात राज्यातील सर्व विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक सहभागी झाले आहेत. बीड जिल्ह्यातील सर्व विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी काळ्याफिती लावून अध्यापनासह सर्व शालेय कामकाज करावे असे आवाहन विना अनुदानित शाळा कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे, मराठवाडा विभागाचे अध्यक्ष वैजनाथ चाटे, मराठवाडा विभागीय कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे, मराठवाडा महिला आघाडीच्या अध्यक्ष मुक्ता मोटे मॅडम, मुंढे मॅडम, प्रतिभा आर्सुळ मॅडम, सुरेखा गायकवाड मॅडम, बीड जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ सर यांनी केले.

गेली पंधरा वर्षांपासून राज्यामध्ये विनाअनुदानित तत्त्वावर साठ हजार शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी काम करीत आहेत. या सर्व शिक्षकांना अनुदानासाठी आतापर्यंत



वेळोवेळी शेकडो आंदोलन केली. शेकडो आंदोलना नंतर या शाळेतील शिक्षकांना २०१६ साली २० टक्के अनुदान मिळाले. त्यानंतर तीन-चार वर्षांनंतर पुढील ४० टक्के अनुदानाचा टप्पा मिळवण्यासाठी वाट पाहावी लागली. त्यानंतर ६० टक्क्याचा वाढीव टप्पा अनुदानासाठी पुन्हा एकदा आंदोलन करावे लागले. त्यानंतर ६० टक्के अनुदान प्राप्त झाले. दरम्यान ८० टक्के अनुदान टप्पा वाढीसाठी राज्यातील विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी ऑक्टोबर २०२३ मध्ये मुंबई येथील आझाद मैदानावर मोठे आंदोलन केले होते. यावेळी राज्याचे शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी ०१ जानेवारी २०२४ पासून टप्पा वाढ देण्याचे आश्वासन दिले होते. परंतु शासनाचे या आश्वासनाची पूर्तता केली नाही. त्यामुळे ८० टक्के टप्पा वाढ अनुदान मिळाले नाही. दरम्यान देशात लोकसभा निवडणूक घोषित झाल्या. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने पुढील अनुदान टप्पा वाढीची प्रक्रिया थांबली. ४ जून रोजी लोकसभा निवडणूक आचारसंहिता संपुष्टात येताच पुढील टप्पा वाढ केली जाईल असे शासनाकडून आश्वासन दिले. दरम्यान पावसाळी अधिवेशनात निधीसह पुढील टप्पा वाढ होईल असे शासनाकडून विना अनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांना वारंवार सांगितले जात होते. दरम्यान पावसाळी अधिवेशन सुरू होण्याच्या पूर्वसंध्येला भर पावसामध्ये विना अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी मुंबई येथील आझाद मैदानावर आंदोलन सुरू केले. यावेळी शासनाने निश्चित आम्ही या अधिवेशनात टप्पा वाढ करणार आहोत. त्यामुळे हे आंदोलन तातडीने मागे घ्यावे असे आवाहन आंदोलनकर्त्या विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांना केले. शासनाने दिलेल्या आश्वासना नंतर विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांनी हे आंदोलन स्थगित केले. त्यानंतर सर्व कर्मचाऱ्यांचे शासनाच्या भूमिकेकडे लक्ष लागले होते. दरम्यान शासनाने काल-परवा विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांना टप्पा वाढ न देता पुन्हा एकदा विनाअनुदानित शाळेत काम करणाऱ्या हजारो शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम केले. शासनाने दिलेला शब्द न पाळल्यामुळे राज्यातील सर्व विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळेत काम करणाऱ्या शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांत संतापाची लाट उसळली. या सर्वांनी आज पासून राज्यात विविध प्रकारचे आंदोलन करण्याचे जाहीर केले आहे. त्याचाच भाग म्हणून राज्यातील सर्व शाळेतील विनाअनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी काळ्याफिती लावून अध्यापनासह इतर सर्व काम करण्याचे जाहीर केले आहे. सर राज्यातील एकाच वेळेला हे सर्व शिक्षक काळ्या फिती बांधून काम करणार असल्याने या आंदोलनात बीड जिल्ह्यातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहभागी व्हावे असे आवाहन कायम विनाअनुदानित शाळा कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे सर, मराठवाडा विभागाचे अध्यक्ष वैजनाथ चाटे, मराठवाडा विभागीय कार्याध्यक्ष जितेंद्र डोंगरे, बीड जिल्ह्याचे मार्गदर्शक लक्ष्मण जगताप, मराठवाडा महिला आघाडीच्या अध्यक्ष मुक्ता मोटे मॅडम, प्रतिभा आर्सुळ मॅडम, सुरेखा गायकवाड मॅडम, मुंढे मॅडम बीड जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ सर, जिल्ह्याचे पदाधिकारी श्री सौंदलकर सर, प्रताप देशमुख सर,श्री शेख सर, रामदास जामकर सर, बीड तालुकाध्यक्ष भागवत यादव सर, मोरे सर, बाळासाहेब नागरगोजे सर, सुरेश कदम सर, यांच्यासह आदींनी केले आहे.

# धनगर समाजाच्या घरकुल योजनेसाठी निधी लवकरात लवकर वितरित करावा

## राष्ट्रीय समाज पक्ष जिल्हाध्यक्ष .अण्णासाहेब मतकर

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना अंतर्गत भटक्या जमाती क वर्ग धनगर समाज बांधवांसाठी घरकुल प्रस्तावास लवकरात लवकर मंजुरी व निधी वितरित करावा कारण की महाराष्ट्र शासनाने लोकसभेच्या आधी धनगर बांधवांचे प्रस्ताव मागितले आहेत पण आज त्याच्यावर कुठलीही कारवाई करण्यात आलेली नाही त्यामुळे राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने माननीय जिल्हाधिकारी साहेब यांना निवेदन देऊन त्यांना या गोष्टीची जाणीव करून दिली

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना अंतर्गत भटक्या जमाती क प्रवर्ग धनगर समाज बांधवांसाठी लाभार्थी घरकुलांचे लाभ देण्यासाठी शासनाने संदर्भ क्रमांक एक व तीनच्या शासन निर्णयानुसार योजना सुरू केलेली आहे सदर योजनेअंतर्गत कुठलीही कारवाई झाली नाही त्यामुळे शासनाने याची दखल घेऊन निधी देवा कारण की धनगर समाजामध्ये गरीब लोक भटकंती करणारे आहेत समाजातील गरीब लोकांसाठी त्या योजनेचा लाभ भेटावा तरी साहेबांनी धनगर समाजातील बांधवांना लवकरात लवकर राहण्यासाठी आपण आमचा प्रश्न सोडवावा ही राष्ट्रीय समाज पक्षाच्या



**आज राष्ट्रीय समाज पक्षाच्या वतीने माननीय जिल्हाधिकारी साहेब यांना निवेदन देण्यात आले**

वतीने महाराष्ट्र शासनाला व अधिकारी साहेबांना विनंती आहे . प्रा. अण्णासाहेब मतकर जिल्हाध्यक्ष रा.स.प. भगवान माने कर्मचारी जिल्हाध्यक्ष. परशुराम काशीद विद्यार्थी जिल्हाध्यक्ष. शिवाजी चांगन जिल्हा सरचिटणीस . माऊली मार्कड विधानसभा अध्यक्ष. बाळासाहेब सापनकर तालुका अध्यक्ष बीड. मोहन खेमाडे तालुका उपाध्यक्ष बीड



मराठा संघर्ष योद्धा मनोज रंगे पाटील यांची सावलीप्रमाणे साथ देणारे आंतरवाली सराटीचे सरपंच पांडुरंग तारक यांनी पाडळसिंग येथील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या वतीने केलेल्या भोजन व्यवस्था कक्षाला भेट देऊन समाधान व्यक्त केले. युवा नेते यशराज पंडित यांनी त्यांचे स्वागत केले.



बीड येथे मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे यांची आयोजित केलेल्या मराठा आरक्षण जनजागृती शांतता रॅली दरम्यान पाडळशिंगी येथे टोलनाक्याजवळ शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या वतीने रॅलीसाठी जाणाऱ्या सर्व समाज बांधवांना जेवण आणि पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. यावेळी जिल्हा परिषदचे माजी अर्थ व बांधकाम सभापती युवानेते युधाजित पंडित आणि युवा नेते यशराज पंडित यांनी स्वतः सर्व समाज बांधवांना आग्रहाने या जेवू घातले.

## जाहीर प्रगटन

आज दि.०९-०७-२०२४ रोज मंगळवार या दिवशी जाहीर प्रगटनाद्वारे जाहीर करतो की, जाहीर प्रगटन देणार यांनी मा. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, बीड यांचे न्यायालयात मौजे तिप्पटवाडी, ता. जि.बीड येथील शेतजमीन गट नं.४८ क्षेत्र ० हे.४१ आर या वडिलोपार्जीत जमीनीचा मालकी हक्क घोषीत करून निरंतर मलाई हुकूम मिळणेसाठी, नियमित दिवाणी दावा क्र.२९६/२०२४ (रणजित विरूद्ध अच्युत व इतर) असा दावा दाखल केलेला आहे व सदर दाव्यामध्ये उपरोक्त जमीनीचे दाव्यातील प्रतिवादी नामे अच्युत सुखदेव मस्के, सौ. मिना भ्र. अच्युत मस्के व विश्वंभर आनंदा रोडे यांनी दाव्याचा अंतीम निकाल लागेपर्यंत कसल्याही प्रकारे हस्तांतरण करू नये, असा तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे. सदरचा मनाई हुकूमाचा अर्ज व दावा मा. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, बीड यांचे न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे. सदर शेतजमीन ही जाहीर प्रगटन देणार याचे मालकीची व ताब्यातील आहे.

जाहीर प्रगटन देणार वास असे खात्रीलायक समजले आहे की, दाव्यातील प्रतिवादी हे जाहीर प्रगटन देणार याचे अपरोक्ष, त्याचे हक्क डावलण्यासाठी वर नमूद दावा मिळकत विक्री करण्याच्या प्रयत्नात आहेत. तसे करण्याचा त्यांना कसलाही कायदेशीर अधिकार नाही.

त्यामुळे जाहीर प्रगटन देणार हे जाहीर प्रगटना द्वारे जाहीर करतात की, वरील वर्णन केलेली जमिनीबाबत कोणीही कोणताही खरेदी-विक्रीचा ज्यामध्ये खरेदीखत, गहाणखत, दानपत्र, बक्षिसपत्र, अथवा कर्ज इत्यादी कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणाचा व्यवहार करू नये, जर काही हस्तांतरणाचा व्यवहार केला तर जाहीर प्रगटन देणार यांच्यावर सदरचा व्यवहार बंधनकारक राहणार नाही व तो त्यांना अमान्य राहील व तो बेकायदेशीर ठरविण्यात येईल. तसेच, सदर जमीनींचा काही हस्तांतरणाचा व्यवहार केल्यास, तो मा. न्यायालयाचे आदेशाचा अवमान होईल. सदर जमिनीबाबतच्या केलेल्या व्यवहारामधून होणारे नुकसानीस जाहीर प्रगटन देणार हे जबाबदार राहणार नाहीत.म्हणून आज रोजी तमाम पंचक्रोशीतील जनतेस जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, वरील वर्णन केलेली जमिनीबाबत कोणीही कसल्याही प्रकारचा

व्यवहार करू नये.

करीता हे जाहीर प्रगटन देण्यात येते.

बीड

दिनांक : ०९-०७-२०२४

मार्फत :

ॲड. बी. के. गायकवाड, बीड

जिल्हा न्यायालय, बीड

मो.नं. ९२८४९८२४९७

**जाहीर प्रगटन देणार**

**रणजित पि. सुखदेव मस्के**

## शिवसंग्राम युवा जोडो अभियान अंतर्गत नारायण घिगे पाटील यांचा असंख्य तरुणासह शिवसंग्राम मध्ये जाहीर प्रवेश

### सोनगावचे युवा नेते नारायण घिगे पाटील यांच्याकडे राजुरी न.चे शिवसंग्राम युवक सर्कल प्रमुख पदाची जबाबदारी



बीड ।वार्ताहर

लोकनेते स्व.विनायकरावजी मेटे साहेब यांच्या संकल्पनेनुसार व डॉ ज्योतीताई मेटे यांच्या मार्गदर्शनाखाली युवा जोडो अभियान अंतर्गत शिवसंग्राम भवन येथे सोनगावचे युवा नेते नारायण लक्ष्मण घिगे पाटील यांनी असंख्य कार्यकर्ते सोबत डॉ.ज्योतीताईं मेटे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसंग्राम मध्ये जाहीर प्रवेश केला.

लोकनेते स्व.विनायकरावजी मेटे साहेब शिवसंग्राम युवा जोडो अभियान अंतर्गत तरुणांना जोडण्याची संकल्पना साहेबांची होती . त्यांच्या पश्चात शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योतीताई मेटे यांच्या मार्गदर्शनाखाली साहेबांची संकल्पना पूर्ण होत आहेत .याचाच एक भाग म्हणून शिवसंग्राम युवा जोडो अभियान अंतर्गत असंख्य तरुणांचा शिवसंग्राम मध्ये जाहीर प्रवेश होत आहे.सामाजिक व राजकीय संघर्ष करण्यासाठी तरुणांची एक फळी निर्माण करून वंचित उपेक्षितांना न्याय मिळावा हा या पाठीमागचा उदात्त हेतू आहे . त्यानुसार शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ. ज्योतीताई मेटे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सोनगावचे युवा नेते नारायण लक्ष्मण घिगे यांच्यासोबत अविनाश घिगे,ज्ञानेश्वर घिगे, अंकुश घिगे, ओंकार धिगे, गौतम घिगे, सोमनाथ धिगे नारायण धिगे,चंद्रसेन धिगे , कृष्णा हिंदुळे, अजय घिगे, बलभीम धिगे, करण धिगे, राजेभाऊ घिगे, कृष्ण घिगे, रणजीत घिगे,संजय घिगे,एकनाथ धिगे, अभिजीत घिगे, अविनाश अलगुडे , मनोज घिगे , नंदकुमार घिगे , शरद घिगे या तरुणांनी शिवसंग्राम मध्ये जाहीर प्रवेश घेतला.

याप्रसंगी बोलताना डॉ. ज्योतीताई मेटे यांनी सांगितले की, आजचे युवक उद्याचे भविष्य असून सुसंस्कृत व निर्व्यसनी तरुण पिढी निर्माण होण्यासाठी एक चांगले संघटन आवश्यक आहे. शिवसंग्राम पक्ष संघटनेच्या नीती मूल्यात युवक तरुणांचे भविष्य देदीप्यमान होईल यात शंका वाटत नाही. तरुणांना मार्गदर्शन करत असताना सोनगाव चे तरुण तडफदार युवा नेते नारायण घिगे यांच्याकडे राजुरी नवगणच्या युवक सर्कल प्रमुख पदाची जबाबदारी यावेळी घोषित केली. बीड विधानसभा प्रमुख प्रा सुभाष जाधव यांनी देखील यावेळी मोलाच् मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध प्रमुख मनोज जाधव यांनी केले तर आभार प्रदर्शन युवक आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष ऋषिकेश सुरवसे यांनी केले.

## राष्ट्रीय महामार्गाचे कर्तव्यशुन्य अधिकारी यांना बडतर्फ करा:- ज्ञानेश्वर चौधरी

### संबंधित अधिकाऱ्यांची बांधकाम मंत्र्यांकडे तक्रार करणार

कडा ।प्रतिनिधी

गेल्या दीड वर्षांपासून साबलखेड ते आष्टी या राष्ट्रीय महामार्गाचे काम अतिशय मंद कासवगतीने सुरू आहे.या रस्त्यावरील सर्वात मोठे चार पुल आहेत,परंतु कडा येथील कडी नदीवरचा सर्वात मोठा पुल आहे. या पुलाचे काम पावसाळाच्या अगोदरच पूर्ण होणे गरजेचे होते यासाठी माजी राज्यमंत्री आमदार सुरेश धस यांनी यासंदर्भात वेळोवेळी संबंधित अधिकारी यांना सूचना देखील दिल्या होत्या यावेळी प्रशासकीय अधिकाऱ्यांनी मोठ्या दिमाखात आश्वासन देखील दिले होते,परंतु राष्ट्रीय महामार्गाचे कर्तव्यशून्य अधिकारी व संबंधित ठेकेदार यांनी मात्र या कडे सोयीस्कर दुर्लक्ष करून पावसाळ्याच्या तोंडावरच काम सुरू केले



मात्र हे कामही रस्त्याच्या कामासारखे मंद गतीने सुरू आहे. काम सुरू असताना संबंधीत ठेकेदाराने पर्यायी मार्ग म्हणून एवढ्या मोठ्या नदीवर फक्त दोन नळ्याच्या पुल तयार केला होता. परंतु काल अचानक आलेल्या पावसामुळे तो पुल वाहुन गेला असुन वाहतुक ठप्प झाली आहे,त्यामुळे तब्बल २५ गावाचा संपर्क तुटला असून वाहतूक व्यवस्था सुद्धा कोलमडून गेल्याने प्रवाशांसह नागरिकांचे मोठे हाल होतांना दिसत आहे

या विषयी सविस्तर माहिती अशी की,साबलखेड ते आष्टी असा १७ किलोमीटर राष्ट्रीय महामार्गाचे गेल्या दीड वर्षांपासून कॉंक्रीटीकरणाचे काम अतिशय कासवगतीने चालू असून ठिकाणी ठिकाणी लहान मोठे नाल्यावरील नदीवरील पुलाचे सुध्दा नव्याने काम सुरू आहे कडा,शेरी बु ,खाकळवडी,जळगाव,कासारी येथे मोठमोठ्या नदीवरील पुलाचे काम नव्याने करण्यात येत आहे तसेच कडा येथे अमोलक जैन विद्यालय, पेट्रोलपंप,शेरी बु-२,वटनवाडी-३, कासारी येथे असे लहान लहान ओढ्यावर पुलाचे काम चालू असून पावसाळ्यापूर्वी पूर्ण न झाल्याने सध्या मृत्यूचे सापळे बनले आहे.

रात्री अचानक आलेल्या पावसाच्या पाण्यामुळे खड्ड्याचा अंदाज न आल्याने एक वाहन थोडक्यात बचावले,दुर्दैवाने खड्डयात एखादा मोठा अपघात झाला तर याला जबाबदार कोण?असा प्रश्न शिवसंग्रामचे तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर चौधरी यांनी उपस्थित केला आहे यापूर्वी विविध प्रसार माध्यमातून वेळोवेळी होणाऱ्या धोक्याची जाणीव करून देऊन सुद्धा राष्ट्रीय महामार्गाचे कर्तव्यशुन्य प्रशासकीय अधिकारी व ठेकेदार मात्र याकडे सोयीस्कर पणे डोळेझाक करत असून या अधिकाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करून त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी ज्ञानेश्वर चौधरी यांनी प्रसिद्ध पत्रकाद्वारे केली आहे.

## वर्ष २०५० पर्यंत किती होणार भारताची लोकसंख्या?

मुंबई: जगभरात दरवर्षी ११ जुलैला जागतिक लोकसंख्या दिन साजरा केला जातो. हा दिवस इतर दिवसांपेक्षा खास असतो कारण हा दिवस वेगाने वाढणारी लोकसंख्या आणि त्याच्याशी संबंधित आव्हानांबाबत जागरूक केले जाते. मात्र तुम्हाला माहीत आहे का की २०५० पर्यंत जगातील लोकसंख्या किती वाढणार आहे तसेच सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या भारताची लोकसंख्या किती असणार आहे?

जागतिक लोकसंख्या दिवस

जगातील सर्व देशांमध्ये ११ जुलैला जागतिक लोकसंख्या दिवस साजरा केला जातो. खरंतर हा दिवस आपल्या सगळ्यांना हे सांगतो की लोकसंख्या नियंत्रण किती महत्त्वाचा मुद्दा आहे तसेच सर्व देशांनी किती गंभीरपणे या मुद्द्यावर काम केले पाहिजे. भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश बनलेला आहे. देशाची लोकसंख्या १४२. ८६ कोटीहून अधिक आहे. तर चीन दुसऱ्या स्थानावर आहे.

जगातील वाढती लोकसंख्या

वाढती लोकसंख्या हा एक चिंतेचा विषय बनला आहे.

## मातंग समाजातील कर्मचारी, सेवानिवृत्त,कार्यकर्ते यांना विनम्र आव्हान

रविवार दिनांक १४/०७/२०२४ सकाळी ११:३० वाजता पंचायत समिती सभाग्रह केज येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला असून या कार्यक्रमास समाजातील विद्यार्थी, पालक, महिला यांनी सह कुटुंब उपस्थित रहावे असे आव्हान संयोजन समिती च्या वतीने करण्यात आले आहे. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. विकास पाथ्रीकर सर, खासदार बजरंग बप्पा सोनवणे, मा. आमदार पृथ्वीराज साठे प्रा. डॉ. रमेश लांडगे सर, प्रा. डॉ. रमेश पारवे सर, मा. सुदाम जी धुपे साहेब, मा. मोहनराव गुंड , मा. नितीन कांबळे, मा. विलास काळुके असे अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी कृपया समाजातील नागरिक कर्मचारी , सेवानिवृत्त , कार्यकर्ते यांनी तन मन धन देऊन सहकार्य करावे असे आव्हान संयोजन समितीचे प्रा. रमेश पाटोळे सर, बाबुराव गालफाडे सर, डी.के. जाधव नाना, दगडु तात्या गालफाडे, डॉ.वेजेनाथ क्षिरसागर , सचिन गालफाडे, गणेश कांबळे यांनी केले आहे



बीड : शहराचे प्रथम नगराध्यक्ष तथा माजी खासदार स्व.द्वारकदास मंत्री यांच्या स्मृतिदिनानिमित्त बीड नगरपरिषद येथे अभिवादन कार्यक्रमास राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ. योगेश क्षीरसागर यांनी उपस्थित राहून अभिवादन केले. यावेळी माजी आ.राजेंद्र जगताप, सिराज देशमुख, माजी राज्यमंत्री प्रा.सुरेश नवले, वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष अशोक हिंगे, भाजप जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, माजी सभापती प्रा.किशोर काळे, महादेव धांडे, नितिन मंत्री, रघु मंत्री आदी उपस्थित होते.

## अन्न आणि पोषण सुरक्षा - कडधान्य योजने अंतर्गत बीज प्रक्रिया संचसाठी अर्ज करण्याचे अवाहन

बीड :-अन्न आणि पोषण सुरक्षा -कडधान्य योजना सन २०२४-२५ या वर्षात बीज प्रक्रिया संच प्राप्त लक्षांकाच्या अधीन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर बाबीचा लाभ घेण्यासाठी पात्रता जिल्ह्यातील नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपनी /संघ.अर्ज कसा करावा, आवश्यक कागदपत्रे लाभार्थी शेतकरी उत्पादक कंपनी /संघ यांनी राष्ट्रीयकृत बँकेकडे प्रकल्प सादर करावा. बँकेने कर्ज मंजूर केल्या नंतर संबंधित शेतकरी उत्पादक कंपनी/संघ सदर बाबीच्या लाभास पात्र राहील.सदर पात्र शेतकरी उत्पादक कंपनी/संघ तालुका स्तरावर तालुका कृषी अधिकारी यांचेकडे अर्ज करण्यास पात्र राहतील.

लाभार्थी शेतकरी उत्पादक कंपनी/संघ अर्ज करताना ज्या कार्यक्षेत्रात शेतकरी उत्पादक कंपनी / संघ आहे त्या तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी कार्यालयात विहित प्रपत्रात अर्ज सादर करण्यात यावा. अर्जा सोबत शेतकरी उत्पादक कंपनी/संघचे लेटर हेडवर अर्ज, शेतकरी उत्पादक कंपनी चे नोंदणी प्रमाणपत्र, शेतकरी उत्पादक कंपनी/संघचे कमीटी ठराव, मागील तीन वर्षाचे शेतकरी उत्पादक कंपनी/संघ चे इरश्र्रपलश डह्यशशीं/-ींवळीं ठळीीं, ज्या जागेवर बीज प्रक्रिया संच उभारणी करण्याचे नियोजन आहे त्या जागेचा ७/१२ व ८-अ चा उतारा जोडण्यात यावा.

अर्ज करण्याचा अंतिम दिनांक

दि.३१ जुलै २०२४ अखेर आपले अर्ज कार्यक्षेत्रातील तालुका कृषी अधिकारी कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर करण्यात यावेत. अंमलबजावणी प्रक्रिया निवड झालेल्या शेतकरी उत्पादक कंपनीस आवश्यक कागद पत्राची छाननी नंतर पुर्वसमती देण्यात येईल. पूर्व संमती भेटल्यानंतर बीज प्रक्रिया संच उभारणीस कार्यारंभ आदेश देण्यात येईल. निवड ते पूर्वसमती व पूर्व संमती ते काम पूर्णत्व यासाठी ज्या आर्थिक वर्षात पूर्वसंमती देण्यात आलेली आहे त्याच आर्थिक वर्षात बीज प्रक्रिया संच प्रकल्प पूर्ण होणे अपेक्षित आहे.

अनुदान रक्कम बीज प्रक्रिया प्रकल्प उभारणीस (यंत्र सामग्री व बांधकामासाठी ) प्रत्यक्ष खर्चाच्या ५० टक्के किवा रु.१०.०० लाख यापैकी जे कमी असेल ते अनुदान देय आहे.तरी जिल्ह्यातील इच्छुक व पात्र, जास्तीत जास्त नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपनी/संघ यांनी आपल्या तालुक्यातील तालुका कृषि अधिकारी,कार्यालय येथे संपर्क करून बीज प्रक्रिया संच उभारणीसाठी अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, बी. के. जेजुरकर यांनी आहे.

## बायपासच्या सर्व्हिस रोड, फ्लायओव्हर चा मुद्दा अधिवेशनात आ.संदीप क्षीरसागरांनी केली तात्काळ कार्यवाहीची मागणी

मुंबई ।प्रतिनिधी

बीड शहरालगत असलेल्या धुळे-सोलापुर राष्ट्रीय महामार्गावर आवश्यक ठिकाणी स्लीप सर्व्हिस रोड आणि शहराचे प्रवेशद्वार असलेल्या दोन्ही ठिकाणी फ्लायओव्हर (उड्डाणपूल) होण्यासाठी आ.संदीप क्षीरसागरांनी वारंवार पाठपुरावा केला आहे. आ.क्षीरसागर यांनी विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात सदरील मुद्दा मांडून यावर तात्काळ कार्यवाही करण्याची मागणी सभागृहाकडे केली आहे.

धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गाचा बीड शहराच्या लगत बाजूने १२ किलोमीटरचा बायपास आहे. याठिकाणी आयआरसी (इंडियन रोड कॉंग्रेस) च्या गाईडलाईन्स नुसार बायपास रोडला जोडणार्या परळी रोड, नाथापूर रोड व इमामपूर रोड या ठिकाणी स्लीप सर्व्हिस रोड आवश्यक आहे. यांपैकी परळी रोड आणि नाथापूर रोड राज्यमार्ग याठिकाणी २०१८ मध्येच सर्विस रोड मंजूर असून अद्यापपर्यंत त्याचे काम सुरू नाही. तसेच इमामपूर रोड प्रमुख जिल्हा मार्ग याठिकाणी सर्विस रोड मंजूर नाही. याबाबत पाठपुरावा करूनही कार्यवाही होत नसल्याने आ.संदीप क्षीरसागर यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावर न्यायालयाने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून येणार्या अर्थिक वर्षात काम पूर्ण करण्याचे शपथपत्र घेतले आहे. दरम्यान बायपासवरील महालक्ष्मी चौक, जिरेवाडी व छत्रपती संभाजी महाराज चौक, समनापूर याठिकाणी उड्डाणपूल नसल्याने मोठ्या प्रमाणावर अपघात होऊन जीवीतहानी होत आहे. तसेच तीन वाहतुकीच्या रस्त्यांसाठी स्लीप सर्व्हिस रोड नसल्याने १२ किलोमीटर बायपासला वळसा घालुन जावे लागत असल्यामुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. सोबतच या बायपासच्या लगत दोन्ही बाजूंनी शेतकर्यांच्या जमीनी आहेत. या शेतकऱ्यांना शेतात जाण्या-येण्यासाठी कसलीही सोय नाही.यावर आ.संदीप क्षीरसागर यांनी हा महत्त्वाचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लागावा यासाठी बुधवार (दि.१०) रोजी विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात हा मुद्दा मांडला आणि तात्काळ या विषयावर कार्यवाही करण्याची मागणी सभागृहाकडे केली.

## महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेची ११६ वी बैठक

### कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली

मुंबई : महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेची ११६ वी बैठक कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात दूरदृष्य प्रणालीद्वारे पार पडली.यावेळी कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक रावसाहेब भागडे, कृषी परिषदेतील संचालक डॉ.हरिहर कौसडीकर राज्यातील चारही कृषी विद्यापीठाचे कुलगुरू आणि परिषदेचे सदस्य दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.




यावेळी श्री. मुंडे म्हणाले की, कृषी महाविद्यालयाचा शैक्षणिक दर्जा वाढविण्यासाठी कृषी महाविद्यालयांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पायाभूत सोयी सुविधा देण्यासाठी प्रयत्नशील असणे आवश्यक आहे. यासाठी आवश्यक निधी शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येईल. विद्यापीठांनी आवश्यकतेनुसार सुधारित प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना ही मंत्री श्री मुंडे यांनी यावेळी दिल्या.

या बैठकीमध्ये एकूण ५४ विषयांवर चर्चा करण्यात आली. यामध्ये शिक्षण विभाग, संशोधन विभाग, विस्तार शिक्षण व साधनसामग्री विकास विभाग आणि प्रशासन या विषयासोबतच कृषी विद्यापीठ आणि कृषी महाविद्यालय यांच्या प्रलंबित विषयांवरही चर्चा करण्यात आली.

## कृषी विभागातर्फे २५० मेट्रीक टन गोदाम बांधकामासाठी अर्ज करण्याचे अवाहन

**बीड :- अन्न आणि पोषण सुरक्षा -कडधान्य व राष्ट्रीय खाद्य तेल अभियान गळीत धान्य सन २०२४-२५ या वर्षात २५० मेट्रीक टन क्षमतेच्या गोदाम बांधकामासाठी प्राप्त लक्षांकाच्या अधीन राहून अर्ज मागविण्यात आले आहे.**

सदर बाबीचा लाभ घेण्यासाठी पात्रता

जिल्ह्यातील नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपनी /संघ यासाठी पात्र असणार आहेत. अर्ज कसा करावा, आवश्यक कागदपत्रे केंद्र शासनाच्या ग्रामीण भंडार योजना, नाबार्डच्या मार्गदर्शक सुचनांनुसार अर्जदारांनी प्रथम राष्ट्रीयीकृत बँकेकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतर बँकने कर्ज मंजूर केल्यानंतरच संबंधित अर्जदार कंपनी सदर बाबीच्या लाभास तालुका स्तरावर तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे अर्ज करण्यास पात्र राहील. लाभार्थ्यांनी अर्ज करताना महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या प्राधिकृत अधिकारी अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मान्यता प्राप्त डिझाइन्स, स्पेसिफिकेशन्स व खर्चाच्या अंदाजपत्रकासह अर्ज तालुका कृषी अधिकारी यांचेकडे सादर करावा.

ज्या कार्यक्षेत्रात शेतकरी उत्पादक कंपनी /संघ आहे त्या तालुक्यातील तालुका कृषी अधिकारी कार्यालयात विहित प्रपत्रात अर्ज सादर करण्यात यावा. अर्जा सोबत शेतकरी उत्पादक कंपनीचे लेटर हेडवर अर्ज, शेतकरी उत्पादक कंपनीचे नोंदणी प्रमाणपत्र, शेतकरी उत्पादक कंपनीचे कमीटी ठराव, मागील तीन वर्षाचे शेतकरी उत्पादक कंपनीचे ताळेबंद लेखा अहवाल ज्या जागेवर गोदाम उभारणी करण्याचे नियोजन आहे त्या जागेचा ७/१२ व ८-अ चा उतारा जोडण्यात यावा.अर्ज करण्याचा अंतिम दिनांक:- दि.३१ जुलै २०२४ अखेर आपले अर्ज कार्यक्षेत्रातील तालुका कृषी अधिकारी कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर करण्यात यावेत.

अंमलबजावणी प्रक्रिया:- निवड झालेल्या शेतकरी उत्पादक कंपनीस आवश्यक कागद पत्राची छाननी नंतर पुर्वसंमती देण्यात येईल.पूर्व संमती भेटल्यानंतर गोदाम बांधकामास कार्यारंभ आदेश देण्यात येईल. निवड ते पूर्वसमती व पूर्व संमती ते काम पूर्णत्व यासाठी ज्या आर्थिक वर्षात पूर्वसंमती देण्यात आलेली आहे त्याच आर्थिक वर्षात गोदाम बांधकाम पूर्ण होणे अपेक्षित आहे.

अनुदान रक्कम:-गोदाम बांधकामाची क्षमता २५० मे. टन असुन अनुदान जास्तीत जास्त रु १२.५० लाख किंवा गोदाम बांधकामास आलेल्या खर्चाच्या ५० टक्के जे कमी असेल ते देय आहे. गोदामाचा वापर शेतकऱ्यांनी उत्पादित केलेला कृषी माल साठवणुकीसाठी शेतकऱ्यांना योग्य व माफक दरात उपलब्ध करून देणे अपेक्षित आहे. या बाबत रु.१०० च्या स्टॅप पेपरवर नोटराईज्ड हमी पत्र देणे बंधनकारक राहील.

तरी जिल्ह्यातील इच्छुक व पात्र, जास्तीत जास्त नोंदणीकृत शेतकरी उत्पादक कंपनी/संघ यांनी आपल्या तालुक्यातील तालुका कृषि अधिकारी,कार्यालय येथे संपर्क करून गोदाम बांधकामासाठी अर्ज करण्यात यावेत असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,बी.के.जेजुरकर यांनी केले आहे.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT